# देगलूर महाविद्यालयाचा विठ्ठल दुडूलवारने पटकावले जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदक



देगलूर - येथील अ.व्या. शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचा विद्यार्थी विठ्ठल दुडूलवार यांने नुकत्याच झालेल्या नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व राजर्षी शाहू कॉलेज, लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने झालेल्या आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून देगलूर महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे. लातुर येथे दि. ११-८-२०२३ रोजी ही स्पर्धा पार पडली दुडूलवार या खेळाडूने १५०० मी फ्रीस्टाईल व ४०० मी फ्रिस्टाईल मध्ये पोहत, सुवर्ण पदक पटकावले आहे त्याच्या या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे. देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमा कांबळे, पर्यवेक्षक प्रा.संग्राम पाटील, कार्याल अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह सव प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आभिनंद केले आहे.

Scanned with OKEN Scanner